आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२ सप्टेंबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं तीन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आगमन,

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून ब्रुनेई आणि सिंगापूरच्या दौऱ्यावर,

- वस्तू आणि सेवा कर संकलनात ऑगस्ट महिन्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत १० टक्के वाढ,

- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या हत्येप्रकरणी तिघांना अटक

**आणि**

- राज्याच्या विविध भागांत पावसाचा जोर, जनजीवन विस्कळीत, पाच जिल्ह्यांना रेड अलर्ट

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं तीन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यासाठी आज कोल्हापुरात आगमन झालं. कोल्हापूर विमानतळावर राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, खासदार धनंजय महाडीक आणि कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी त्यांचं स्वागत केलं. त्यानंतर मुर्मू यांनी करवीर निवासिनी अंबाबाईचं दर्शन घेतलं. त्या आज वारणानगर इथं श्री वारणा महिला सहकारी गटाच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

उद्या त्या पुण्यात सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठाच्या २१व्या दीक्षांत समारंभाला संबोधित करतील. तसंच महाराष्ट्र विधान परिषदेच्या शतकमहोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमात भाग घेतील. दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी

लातूरच्या उदगीर इथं बुद्धविहाराचं उद्घाटन मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. तसंच शासन आपल्या दारी आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांची भेटही राष्ट्रपती घेणार आहेत.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून ब्रुनेई आणि सिंगापूरच्या दौऱ्यावर जाणार आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे पूर्व विभागाचे सचिव जयदीप मजुमदार यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. भारत ब्रुनेई राजनैतिक संबंधांना ४० वर्ष पूर्ण होत असताना हा दौरा होत असून ब्रुनेईला भेट देणारे मोदी हे पहिले भारतीय प्रधानमंत्री आहेत, असं ते म्हणाले. ब्रुनेईचा दौरा झाल्यानंतर प्रधानमंत्री सिंगापूरला जाणार आहेत. सिंगापूरच्या प्रधानमंत्र्यांच्या आमंत्रणावरुन ते तिथे जाणार असून या भेटीत अनेक महत्त्वाचे करार होण्याची शक्यता आहे.

<><><><><>

वस्तू आणि सेवा कर संकलनात ऑगस्ट महिन्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत १० टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात एक कोटी ५९ लाख रुपये संकलन झालं होतं, तर यंदा ही रक्कम १ कोटी ७५ लाख रुपये असल्याचं सरकारी आकडेवारी दाखवते. जीएसटी अंतर्गत करदात्यांना परतावा देण्यापूर्वी केंद्र सरकारनं ३० हजार ८६२ कोटी रुपये जमा केले, तर राज्यांनी ३८ हजार ४११ कोटी रुपये जमा केले आहेत. आयात आणि आंतरराज्य विक्रीवरच्या एकात्मिक वस्तू आणि सेवा कराचं संकलन ९३ हजार ६२१ कोटी रुपये इतकं होतं.

<><><><><>

ज्येष्ठ मराठी नाट्य, साहित्य समीक्षक आणि अभ्यासक प्रा. विजय तापस यांचं काल मुंबईत निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते. गेले काही दिवस ते कर्करोगानं आजारी होते. विजय तापस समीक्षणाबरोबरच विविध वृत्तपत्रांतून स्तंभलेखनही

करत होते. त्यांच्या पार्थिवावर काल अंधेरी इथं पारशीवाडा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

<><><><><>

महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना फाशीची शिक्षा देण्याची तरतूद असलेला शक्ती कायदा तातडीनं मंजूर करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार अनिल देशमुख यांनी केली आहे. ते मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. या मागणीसाठी उद्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची महिला आघाडी आंदोलन करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. महाविकास आघाडी सरकारच्या काळात विधिमंडळानं संमत केलेला हा कायदा तीन वर्षांपासून केंद्र सरकारकडं मान्यतेसाठी पडून आहे. तो केंद्राने लवकरात लवकर मंजूर करून राज्यात लागू करावा, असं देशमुख यावेळी म्हणाले.

<><><><><>

राज्य विधानसभेच्या आगामी निवडणुकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मतदानरूपी आशीर्वाद द्यावा, असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनसन्मान यात्रेत आज वरूड इथं ते बोलत होते. कांदा उत्पादक शेतकऱ्यांसोबत विदर्भातले कापूस, सोयाबीन, संत्री उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा उल्लेख त्यांनी केला. कांदा निर्यातबंदी होऊ नये, सोयाबीन आणि कापसाला योग्य भाव मिळावा, यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

<><><><><>

मालवणच्या राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याच्या निषेधार्थ महाविकास आघाडीनं आज धुळे शहरात शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ निषेध आंदोलन केलं. महाविकास आघाडीचे धुळे जिल्ह्यातले प्रमुख पदाधिकारी या आंदोलनात सहभागी झाले.

**<><><><><>**

श्रावण अमावस्या म्हणजेच बैलपोळ्याचा सण आज साजरा होत आहे. शेतकरी या दिवशी बैलांना प्रेमाने सजवून, ओवाळून, त्यांची मिरवणूक काढतात.

**नागपूर** मधे यादिवशी तान्हा पोळा साजरा केला जातो. ऐतिहासिक मारबत उत्सवाला १४४ वर्षांची परंपरा लाभली आहे. वर्षभर घडणाऱ्या विविध घटना आणि विषयांवर आधारित भाष्य करणाऱ्या बडग्यांची मिरवणूक उद्या निघणार आहे. तान्हा पोळा आणि मारबत बडग्यांसाठी नागपूर पोलिसांनी शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची काल पुण्याच्या नाना पेठेत गोळ्या झाडून हत्या झाली. दुचाकीवरुन आलेल्या १३ हल्लेखोरांनी आंदेकर यांच्यावर कोयत्यानं हल्ला केला आणि नंतर गोळ्या झाडल्या असं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. पोलिसांनी याप्रकरणी ३ जणांना अटक केली असून पुढचा तपास सुरु आहे. घरगुती वादातून हा प्रकार घडला असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

अकोला शहरात आज श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी राजेश्वराला जलाभिषेक केला जाणार आहे. गंगाधाम इथून वाहणाऱ्या पूर्णा नदीच्या पवित्र पाण्याने राजेश्वराला अभिषेक करण्याची ही परंपरा अनेक वर्षं जुनी आहे. यासाठी अनेक कावड आणि पालख्या घेऊन शिवभक्त रविवारी रात्री गांधीग्रामकडे रवाना झाले आहेत. नदीचं पाणी भरलेले कावड खांद्यावर घेऊन चालत हे सर्वजण आज अकोल्यात येतात आणि त्या पाण्याचा अभिषेक राजेश्वराच्या पिंडीला केला जातो. या महोत्सवाचा उत्साह आज शहर आणि जिल्ह्यात दिसून येत आहे.

**<><><><><>**

शेतात घुसून पिकांचं नुकसान करणारी रानडुकरं आणि नीलगाईंना मारण्याची परवानगी २४ तासांच्या आत देण्याचा निर्णय राज्याच्या महसूल आणि वनविभागानं घेतला आहे. याआधी अशी परवानगी शेतकरी किंवा वनविभागाच्या अधिकाऱ्यांना नव्हती. आता अशी परवानगी मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना संबंधित वनक्षेत्रपालांकडे लेखी अर्ज करून त्याची पोचपावती घ्यावी लागेल. अर्ज दाखल झाल्यानंतर २४ तासांच्या आत परवानगी दिली नाही, किंवा नाकारली नाही, तर ती परवानगी दिली असल्याचं गृहीत धरलं जाणार आहे.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रीमंडळानं डिजिटल कृषी धोरणाला मंजुरी दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली  नवी दिल्लीत आज ही बैठक झाली.

**<><><><><>**

पॅरिस पॅरालिम्पिकच्या आजच्या पाचव्या दिवशी भारताचा थाळीफेकपटू योगेश कथुनिया यानं रौप्यपदकाला गवसणी घातली आहे. पकतालिकेत आज आणखी भर पडण्याची आशा आहे. तिरंदाज शीतल देवी आणि राकेश कुमार, धावपटू दीप्ती जीवनजी, भालाफेकपटू सुमित अंतिल यांच्याकडून उत्तम कामगिरीची अपेक्षा आहे.

**<><><><><>**

राज्याच्या विविध भागात पावसानं जोर धरला असून विशेषतः मराठवाड्यात ठिकठिकाणी नद्यांचे प्रवाह वाढले आहेत. अनेक ठिकाणी शेतात आणि वस्तीत पाणी शिरल्याने पूरस्थिती उद्भवली आहे.     **परभणी** जिल्ह्यात करापरा नदीला पूर आल्याने जिंतूर तालुक्यातल्या अनेक गावांना पुराचा वेढा बसला आहे.  अनेक घरांमध्ये पाणी आल्याने जनजीवन विस्कळित झालं असून ,सोयाबीन कापूस पिकात पाणी साचल्याने नुकसान झालं आहे. अनेक ठिकाणी पशुधनाचंही नुकसान

झालं आहे. परभणी - जिंतूर महामार्गावरची वाहतूक बंद झाली आहे. सेलू इथं पूरस्थिती निर्माण झाली असून उपायुक्तांनी लष्कराला मदतीसाठी पाचारण केलं आहे. ६० सैनिक आणि वैद्यकीय पथकं बचावकार्य करत आहेत. दिग्रस बंधाऱ्याचे ४ दरवाजे उघडण्यात आले आहेत. सिध्देश्वर धरणातूनही मोठया प्रमाणात पाणी सोडलं जात आहे. गोदावरी नदीची पाणीपातळी सध्या ३४८ मीटर इतकी आहे. पाण्याचा प्रवाह असाच कायम राहिल्यास आणखी काही दरवाजे उघडले जाऊ शकतात. नदीकाठच्या रहिवाशांना सावधानतेचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे. **हिंगोली** जिल्ह्यात दोन दिवसापासून संततधार पाऊस असून कयाधू नदीला महापूर आला आहे. यामध्ये १० ते १५ गावांतल्या शेतांमध्ये पुराचं पाणी घुसल्याने शेतात राहणारे मजूर अडकले आहेत. तसंच कळमनुरी तालुक्यातल्या देवजना गावातल्या शिवारात १५ ते २० मजूर पुराच्या पाण्यात अडकले आहेत. डोंगरगाव पूल इथं पुराच्या पाण्यात अडकलेल्या ७ जणांपैकी ५ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आलं आहे. हवामान विभागानं येत्या २४ तासांसाठी **धुळे, नंदुरबार, परभणी, हिंगोली, आणि नांदेड** या जिल्ह्यांमधे जोरदार पावसाचा रेड अलर्ट दिला आहे. **जळगाव, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, अकोला आणि यवतमाळ** या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे.

//<><><><><>//